१) ~~इकडील नोटीस क्र.~~ मिळकत धारक यांचा अर्ज दि. २०/९/२०११
२) ~~तलाठी~~ मं. क्र. ---- यांचा रिपोर्ट क्र. २५/२०११
दि. ११/२/२०११

तहसिलदार नाशिक यांचे कार्यालय
क्रमांक जमा/ अना. बि. शे../ एसआर / ५१ /२०११
दिनांक :- २४/२/२०११

## महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम, १९६६ चे कलम ४५ नुसार अंतरिम आदेश

१) मौजे पळसे ता नाशिक जि. नाशिक येथील स.नं. — / ग.नं. १८ पैकी प्लॉट क्र. — यांसी क्षेत्र १५०.० चौ.मी. ही मिळकत श्री / ~~श्रीमती~~ संपतराव नारायण देशमुख ३९ यांनी धारण केलेली आहे.

सदरचे जमिनीचा सन १९९८-९५ पासून ~~रहिवासी~~ / ~~औद्योगिक~~ / वाणिज्यीक प्रयोजनासाठी अनधिकृत अकृषिक वापर होत आहे. सदर जमिनीवर तलाठी मं. क्र. ---- यांनी केलेल्या पंचनाम्याप्रमाणे बांधकाम श्री. / ~~श्रीमती~~ संपतराव नारायण देशमुख यांनी केलेले आहे. जमिन मालक यांनी बांधकाम सुरू करण्यापूर्वी बांधकामाचा नकाशा ग्रामपंचायत / ~~न.पा. / महानगर~~ पालिका यांचेकडून मंजूर करून घेतलेला नाही/सादर केलेला ~~नाही.~~ आहे

२) महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ प्रमाणे मिळकतधारक यांनी योग्य त्या सक्षम प्राधिकाऱ्याची (महसुल अधिकारी) पूर्व अकृषिक प्रयोजनासाठी परवानगी न घेता अनधिकृत अकृषिक वापर केलेला आहे.

३) याबाबत मिळकत धारकांस यांनी दिनांक २०/९/२०११ रोजी दिलेल्या अर्जाप्रमाणे ~~नोटीसीप्रमाणे~~ त्यांनी ~~उत्तर दिलेले नाही / उत्तर दिलेले आहे ते~~ खालीलप्रमाणे. नमूद केले आहे
मिळकतीमध्ये निवासी व वाणिज्य वापर केल्याने नियमानुसार होणारी दंडाची रक्कम भरण्यास तयार आहे

४) यावरुन सदर प्रकरणात मौजे पळसे ता. नाशिक जि. नाशिक येथे स. नं. १८ पै. प्लॉट नंबर — पैकी क्षेत्र १५०.०० चौ.मी. निवासी ---- वाणिज्यिक २२१-८०.चौ.मी. यात महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४४ अन्वये सक्षम प्राधिकाऱ्यांकडून अकृषिक परवानगी न घेता अनाधिकृत अकृषिक वापर केल्याने उक्त कायद्याचे कलम ४५ मध्ये नमूद केल्यानुसार ते दंडास पात्र आहेत.

५) त्यानुसार मा. जिल्हाधिकारी नाशिक यांचेकडील आदेश क्र. मशा / कक्षा-३/५/७७३/२००५ दि. २५/१०/०५ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार खालीलप्रमाणे आदेशीत करीत आहे.

६) मिळकत धारकाने सदर जमिनीचा दर चौ. मी. ला बिनशेती दर रू. जुना ०-३२ पै / नवा ०-९० पै /- याप्रमाणे निवासी व रू. ---- /- वाणिज्य प्रयोजनासाठी दि. १९९८-९५ पासुन दि. २०१०-११ / पर्यंत रू. ३३२६२ /- (स्थानिक उपकरासह) तसेच यापुढे सदरचा वापर बंद करेपर्यंत किंवा पुढील आदेश होईपावेतो यापैकी जे अगोदर असेल त्या कालावधीसाठी

अकृषीक सारा भरणा करावा.

ब) तसेच मिळकतधारकाने अकृषिक साऱ्याचे ४० पट दंड रू. ......१९२००/-...... भरावा.

यापुढे असेही फर्माविण्यात येत आहे की, मिळकतधारकाने वरील अ व ब प्रमाणे एकूण रक्कम रूपये ......५२४९२/-....../- अक्षरी रक्कम रूपये ......बावन्न हजार चारशे ब्याण्णव मात्र...... हा आदेश मिळालेचे तारखेपासून ७ दिवसांचे आंत शासनास भरणा करावा. यात चुकल्यास सदरची रक्कम जमिन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

६) याद्वारे असे स्पष्ट करण्यात येते की, महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ४७ (ब) नुसार अकृषिक आकार व कलम ४५ खाली दंड भरला असला तरी त्यामुळे सदर अनधिकृत अकृषिक वापर नियमित करण्यात आला आहे व सदरचे बांधकाम नियमित करण्यात आले आहे असे समजता येणार नाही. जर मिळकतधारकास अनधिकृत अकृषिक वापर उक्त कायद्याचे कलम ४७ (अ) खाली नियमित करणेची इच्छा असेल तर त्याने महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ व त्याखालील नियमानुसार सक्षम प्राधिकाऱ्याकडे आवश्यक त्या कागदपत्रांसह या आदेशाचे तारखेपासून सहा महिन्याचे आत अर्ज करावा. यात चुकल्यास महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम व त्या खालील नियमान्वये सदरचा अनधिकृत अकृषिक वापर बंद करून, त्यावरील बांधकाम काढून टाकणेबाबत कार्यवाही करण्यात येऊन बांधकाम काढून टाकणेकामी लागणारा खर्च मिळकतधारकाकडून जमीन महसुलाची थकबाकी म्हणून वसुल करण्यात येईल.

७) याद्वारे आणखी असेही स्पष्ट करण्यात येते की, मिळकत धारकाने यापुढे सक्षम प्राधिकाऱ्याकडून कलम ४४ अन्वये बिनशेती परवानगी मिळेपर्यंत कोणतेही बांधकाम करू नये.

sd/- Signed by Tehsildar
तहसिलदार, नाशिक

प्रति,

श्री. सपतराव नारायण देशमुख इ १
रा. १२ गणेशनगर नाशिक
प्रत :- तलाठी ......पंचक...... यांचेकडेस वसुलीसाठी रवाना.
२/- त्यांनी सदरची र. रू. ......५२४९२/-...... /- मुदतीत वसुल करून वसुलीचा तपशील कळवावा तसेच गा.न.नं. ४ ला नोंद घेऊन किरकोळीत वसुल दर्शवावा.

प्रत : - माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी

१) सरपंच, ग्रामपंचायत ......
२) म. सहा. संचालक, नगररचना, नाशिक
३) म. सहा. संचालक नगररचना नाशिक महानगरपालिका, नाशिक
४) म. आयुक्त, नाशिक महानगरपालिका, नाशिक

तहसिलदार